पोलीस अधीक्षक कार्यालय नाशिक ग्रामीण,
पोलीस मुख्यालय, आडगाव नाशिक – पिन 422003, दुरध्वनी नंबर 0253–2309700
E.Mail - sp.nashik.r@mahapolice.gov.in

प्रेस नोट दि.२३/११/२०२१

## वाडीव-हे पोलीस ठाणे हदीतुन गोवंश जनावरांची चोरी व कत्तल करुन अवैधरीत्या वाहतुक करणारी मुंबई येथील टोळीतील गुन्हेगारास अटक

नाशिक जिल्हयातील खेडोपाडयातील गोवंश जनावरांचे चोरीचे प्रकारांना आळा घालणेकामी मा.पोलीस अधिक्षक श्री सचिन पाटील यांचे मार्गदर्शन व सुचनाप्रमाणे कारवाई सुरु आहे.

वाडीव–हे पोलीस ठाणे । गुन्हा नोंद क्र १९/२०२२ कलम ३७९,४२९ भादवी सह कलम ५ अ ,९ महाराष्ट प्राणि सरंक्षण (सुधारीत) अधिनियम १९९५ अन्वये दाखल गुन्हयाचे तपासात मा.पोलीस अधिक्षक श्री सचिन पाटील यांचे मार्गदर्शनाप्रमाणे मिळालेल्या गोपनिय माहीतीच्या आधारे वाडीव–हे पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अनिल पवार, सहा पोलीस निरीक्षक सुनिल पाटील, पोलीस नाईक/संदीप हांडगे, पोशि/तुषार खालकर,पोशि/निलेश मराठे यांचे पथकाने गुन्हयांमध्ये तांत्रीक विश्लेषणाचा आधारे मेहनत व चिकाटीने प्रयत्न करुन गुन्हा उघडकीस आणला. गुन्हयामध्ये कौसा मुंब्रा जिल्हा ठाणे येथुन गुन्हयातील आरोपीत समीर नजीम शेख वय २७ वर्षे यास अटक केली. तसेच गुन्हयात वापरलेली स्विप्ट कार जप्त करण्यात आली आहे. नमुद गुन्हयाचा तपास मा. पोलीस अधिक्षक, नाशिक ग्रामीण यांचे मार्गदर्शनाखाली सहा. पोलीस निरीक्षक सुनिल पाटील हे करीत आहेत.

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे मा.पोलीस अधिक्षक श्री.सचिन पाटील यांचे मार्गदर्शन व सुचनेप्रमाणे वाडीव–हे पोलीस ठाणेकडील पथकातील पोलीस निरीक्षक अनिल पवार, सहा पोलीस निरीक्षक सुनिल पाटील, पोहवा/खांदवे, पोलीस नाईक/संदीप हांडगे, पोना/अनदीप पवार, पोशि/तुषार खालकर,पोशि/निलेश मराठे, पोशि/काकासाहेब निबांळकर, पोशि/ लहु भावनाथ यांनी सदरची कामगिरी केली आहे.